# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** कंधार
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0416 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**17/12/2025 22:26

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 03/11/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 03/11/2025
**Time From (वेळेपासून):** 13:45 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:18 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 17/12/2025 **Time (वेळ):** 22:06 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 028
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/12/2025 22:06 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय कंधार

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अर्चना वैजनाथ करपुडे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1987

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभागनांदेड,कंधार,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभागनांदेड,कंधार,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8087343862

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शेख नवाज शेख महबुब | | | 1. तहसील कार्यालय कंधार , कंधार,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक:- 17/12/2025

मी श्रीमती अर्चना वैजनाथ करपुडे, वय 38 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद पोलीस निरीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड मोबाईल क्रमांक 8087343862
सरकार तर्फे फिर्यादी होवून लेखी फिर्याद देते की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे मागील सहा महीन्यापासुन पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत आहे.

आम्ही दिनांक 30/10/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट कार्यालयात हजर असतांना प्रभारी अधिकारी पोलीस उप अधीक्षक श्री प्रशांत पवार साहेब, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांनी त्यांचे कक्षात बोलावून तक्रारदार विठ्ठल शंकरराव खाडे वय 70 वर्षे, व्यवसाय - शेती, रा. भवानी नगर कंधार, ता. कंधार जि. नांदेड मुळ गाव नागलगाव, ता. कंधार जि. नांदेड यांची तक्रार नोंदवुन पुढील कारवाई करणे बाबत आदेशीत केले.

त्यावरून आम्ही तक्रारदार श्री विठ्ठल शंकरराव खाडे यांना विचारपुस केली. तेव्हा तक्रारदार यांनी कळविले की, तक्रारदार यांना नागलगाव शिवारात शेत गट क्र. 59 व 60 मध्ये 1 हेक्टर 09 आर शेती असून ती मी बटईने दिली आहे. मला माझे घरात माझे वडील व आजोबा हे मला विठोबा या नावाने बोलत असल्याने माझे वडीलांनी माझे शेताचे 7/12 वर माझे नाव विठोबा शंकर खाडे असे नाव टाकले होते. वास्तविक माझे नाव सर्व डॉक्युमेंटस्वर विठ्ठल शंकर खाडे असे नाव आहे. तसेच मी यापूर्वी माझे, माझी पत्नी रूक्मीनबाई विठ्ठलराव खाडे व मुलगा महेश विठ्ठलराव खाडे यांच्या नावावर स्टेट बँक आफ इंडीया, शाखा कंधार कडून प्रत्येकी 25,000/- रूपये क्रॉप लोन घेतले होते. ते मी पूर्ण भरले असून आता मला आमच्या तिघांच्या नावे नवीन क्रॉप लोन घेणे आहे. त्यासाठी बँकेने 7/12 वरील बोजा कमी करून आणा असे सांगितले आहे व तसे लेखी पत्र सुध्दा दिले आहे. त्यामुळे मी दि. 08/09/2025 रोजी माझे शेताचे 7/12 व होल्डींगवर माझे नाव दुरूस्तीसाठी व आमच्या तिघांच्या 7/12 वर नमूद असलेले बोजा कमी करून घेण्यासाठी आमच्या गावच्या तलाठी यांना 7/12 वर नाव दुरूस्त करण्यासाठी 100/- रूपयाचे बॉन्डवर शपथपत्र नोटरी करून सोबत 7/12 व होल्डींग, आधार कार्ड, पॅन कार्ड व बँकेचे पासबुक दिले. त्यांनतर तलाठी मॅडम यांनी दिनांक 05/10/2025 रोजी नोटीस काढली. त्यानंतर मी दिनांक 15/10/2025 रोजी मंडळ अधिकारी शेख नवाज यांच्या कार्यालयात जावून त्यांना भेटलो असता त्यांनी सांगितले की, तुमचे 7/12 चे काम दोन दिवसात होवून जाईल व काम झाल्यावर पैसे दया असे सांगून मला लाचेची मागणी केली.

त्यांनतर दिनांक 28/10/2025 रोजी मंडळ अधिकारी कंधार यांनी मला कॉल करून सांगितले की, तुमचे सातबाराचे काम केले आहे. तुमच्या व्हॉटसअप वर पाठविले आहे. कधी येता तुम्ही मला भेटायला या असे सांगितले. तेव्हा मी त्यांना मी बाहेर आहे येतो दोन दिवसात असे सांगितलो. मी माझे मोबाईल वरील व्हॉटसअप वर सातबारा बघितला तेव्हा मला समजले की माझे काम झाले आहे. तरी मडंळ अधिकारी शेख नवाज हे मागत असलेले पैसे ही लाच असल्याची माझी खात्री झाली असून ती माझी देण्याची इच्छा नाही. शेख नवाज यांचेसोबत माझी वैर दुश्मनी नाही किंवा माझे त्यांचेसोबत पैसे देण्या-घेण्याचा व्यवहार नाही.

तरी मंडळ अधिकारी शेख नवाज हे माझे नावावर असलेल्या शेतीचे 7/12 व होल्डींग वर माझे नाव विठोबा शंकर खाडे ऐवजी विठ्ठल शंकर खाडे असे दुरूस्त केल्यामुळे झालेल्या कामाचा मोबदला म्हणुन लाचेची मागणी करित आहेत. मंडळ अधिकारी शेख नवाज यांनी माझेकडे लाचेची मागणी करून स्वतःकिंवा इतरामार्फत स्विकारल्यास त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करावी असे सांगितले तक्रारदार यांना लिहता येत नसल्यामुळे त्यांनी सांगितलेली तक्रार संगणकावर टंकलिखीत केली.

पुढील गोपनिय कामाकरीता महावितरण मंडळ कार्यालय नांदेड येथील दोन शासकीय पंच उपलब्ध करून घेतले. दिनांक 03/11/2025 रोजी दोन्ही पंच व सापळा कार्यवाहीत अंमलदार पोकाँ/3199 रापतवार, पोकाँ/1487 जाधव, चापोहेकाँ/नामपल्ले यांच्यासह सापळा कार्यवाहीसाठी आम्ही सापळा पथक व पंच असे शासकीय वाहन गाडी क्रमांक एम.एच.26 आर 0657 ने 12:01 वाजता निघुन कंधार शहरातील किल्लाच्या ठिकाणी सुरक्षित 13:17 वाजता येऊन थांबलो. तक्रारदार यांना सुचना दिल्या प्रमाणे त्याठिकाणी हजर आले. तक्रारदार यांनी त्यांची लोकसेवक यांच्या विरूध्दची तक्रार दोन्ही पंचास तोंडी सांगीतली त्यानंतर दोन्ही पंचानी तक्रारदार यांनी दिनांक 30/10/2025 रोजी दिलेली तक्रार व तोंडी कथन करत असलेली तक्रार एकच असल्याची खात्री केल्याने त्यावर दोन्ही पंचानी सहया केल्या. ज्यावर आम्ही व तक्रारदार यांनी यापूर्वीच सहया केल्या होत्या. त्यानंतर लाचमागणी पडताळणी कामी तक्रारदार व पंच क्रंमाक 1 यांना लोकसेवक मंडळ अधिकारी नवाज यांची भेट घेण्याकरीता 13: 43 वाजता तहसील कार्यालय कंधार येथे रवाना केले.

त्यानंतर 14:18 वाजताचे सुमारास तक्रारदार व पंच क्र. 1 हे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच क्र. 1 श्री शेख अहमद यांना पंच क्र. 2 यांचे समक्ष विचारणा केली. तेव्हा पंच क्र. 1 यांनी सांगीतले की, आम्ही दोघे तहसील कार्यालय कंधार येथे गेलो. तेव्हा तक्रारदार यांनी मंडळ अधिकारी यांना फोन लावून विचारणा केली. तेव्हा मंडळ अधिकारी यांनी तक्रारदार यांना सांगितले की, थांबा थोड मीच येतो तिथे असे म्हणाले, त्यांनतर थोडया वेळाने त्या ठिकाणी मंडळ अधिकारी आले. तक्रारदार व मंडळ अधिकारी हे चहा च्या कॅन्टीनमध्ये गेले. त्यांनतर तक्रारदार म्हणाले की सर झाल काम,,,, तेव्हा लोकसेवक शेख नवाज म्हणाले की, तुम्हाला पी.डी.एफ पाठविलो की,,,,तुम्हच काम केले मी तुम्हचे काम कसे केलो मज मला माहित काय सागू मी तुम्हाला,,,,,,,, तेव्हा तक्रारदार म्हणाले धन्यवाद,,,, साहेब काम केल्या मुळे पुढे काय म्हणता,,, असे बोलल्या वर लोकसेवक नवाज म्हणाले तुम्हाला माहित आहे की,,,, तुम्ही अनुभवी माणस आहेत ,,,,,,,,तुम्हाला काय सागयच तुम्हाला सांगितलो की आधी तेव्हा तक्रारदार म्हणाले की आधीच जावूदया हो,,,,,,,,, आता सांगा काय म्हणता किती म्हणता तेव्हा लोकसेवक नवाज म्हणाले की काय दयाचे ते दया,,,,,, किती पण दया,,, तेव्हा तक्रारदार म्हणाले पाचशे रूपये देवू का ? तेव्हा लोकसेवक म्हणाले अस कुठ असते काय,, काम झाल म्हणुन असे बोलाल्या तेव्हा तक्रारदार म्हणाले किती देवू सांगा की मग तेव्हा लोकसेवक नवाज म्हणाले की तीन दया ,,,, तेव्हा तक्रारदार म्हणाले दोन देतो,,,, तेव्हा लोकसेवक म्हणाले की एक हजार का कमी करता,,,,नाही तीनच दया,,,, असे बोलून तक्रारदार म्हणाले ठीक आहे मी घेवून येतो तेव्हा लोकसेवक नवाज म्हणाले की आनल्या नाही काय सोबत ,,, तेव्हा तक्रारदार म्हणाले नाही घेवून येतो, तुम्ही किती वेळ आहेत. तेव्हा लोकसेवक म्हणाले की, या मी आहे इथे असे असे म्हणून तक्रारदार यांचेकडे लोकसेवक नवाज यांनी लाचेची मागणी केल्याचे दोघांनी सांगीतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व लोकसेवक यांच्या भेटी दरम्यान डिजीटल व्हाँईस रेकाँर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता लाचमागणी पडताळणीत मंडळ अधिकारी शेख नवाज यांनी तक्रारदार खाडे यांना त्यांचे सातबारा वरील नाव दुरुस्त केली व केलेल्या कामाचा मोबदला म्हणुन 3000/- रू लाचेची मागणी करून लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. मंडळ अधिकारी शेख नवाज यांनी तक्रारदार खाडे यांना झालेल्या कामाचा मोबदला म्हणुन लाचेची मागणी करुन पैसे घेवुन येण्यास सांगीतल्याने लाच स्विकृती सापळा कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला. तक्रारदार यांनी पुढील सापळा कार्यवाहीसाठी लागणारी लाचेची रक्कम लोकसेवक नवाज यांना देण्याकरीता 3,000/- रुपये हजर केले. नमुद लाच रक्कम 3,000/- रूपये रकमेच्या भारतीय चलनी नोटांना अँथ्राँसिन पावडर लावुन तक्रारदार यांचे शर्टच्या समोरील डाव्या खिशात अलगद ठेवून दिले. सापळा कार्यवाहीच्या अनुशंगाने सर्व सापळा पथक यांना योग्य त्या सुचना दिल्या. लोकसेवक यांना भेटीचे ठिकाण निश्चित करण्याकरीता लोकसेवक नवाज यांचे मोबाईल क्रमांक 9850084469 वर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक 7588067351 वरून काँल केला. तेव्हा तक्रारदार यांनी लोकसेवक नवाज यांना सांगितले की सर मला थोडा उशीर झाला,,,,,यायला मी आलो आहे तुम्ही कुठे आहे ? तेव्हा लोकसेवक मंडळ अधिकारी नवाज यांनी सांगितले की मी नांदेडला चाललो आता नाही भेटणार, आपण उदया भेटूता असे सांगितले. त्यावरून पुढील कार्यवाही उदईक रोजी करण्याचा निर्णय घेवून सर्व सापळा पथक नांदेड ला.प्र.वि कार्यालय येथे आलो.

दिनांक 04/11/2025 रोजी आम्ही, दोन्ही पंच व सर्व सापळा पथक असे सापळा कार्यवाहीसाठी लागणारे सर्व साहित्य घेवून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड कार्यालयातुन 10.05 वाजता रवाना झालो तक्रारदार खाडे यांनी लोकसेवक नवाज यांना भेटीचे ठिकाण निष्चित करण्याकरीता काँल केला परंतु लोकसेवक नवाज यांनी तक्रारदार यांचा काँल उचलला नाही. त्यांनतर थोडया वेळात तक्रारदार यांनी सांगितले की लोकसेवक नवाज हे कंधार तहसील कार्यालय मध्ये असल्याचे सांगितले. सापळा कार्यवाही करीता 12:57 वाजता व्हाँईस रेकाँर्डर चालु करून लाचेची रक्कम देवून तक्रारदार आणि पंच क्रं.1 यांना तहसील कार्यालय कंधार येथे लोकसेवक यांच्याकडे

रवाना केले. तक्रारदार व पंच क्र.1 तहसिल कार्यालय कंधार च्या प्रांगणात पोहचले. काही वेळाने तक्रारदार व पंच क्र. 1 हे काही एक ईशारा न देता तहसिल कार्यालय कंधार येथुन बाहेर आले.
त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना बाजुला थांबुन पंच क्र. 2 यांचे समक्ष पंच क्र. 1 यांना विचारले असता, त्यांनी सांगीतले की, लोकसेवक शेख नवाज हे मिटींग मधुन बाहेर आले तेव्हा तक्रारदार यांनी लोकसेवक यांना सांगितले की, साहेब हे तुम्ही सांगितलेले तीन हजार रूपये घेवून आलो आहे. ,,,,तेव्हा लोकसेवक म्हणाले राहु दया मी मिटींग मध्ये आहे ते,,, तेवढ महत्वाचे नाही. नंतर कधी बघूत असे बोलून मिटींग गेले ,,,लोकसेवक हे गडबडीत असल्यामुळे जास्त बोलणे झाले नाही असे हकीकत कथन केली. त्यांनतर मिटींग समाप्त झाल्यानंतर तहसील कार्यालयाच्या परिसरातील कॅन्टीनमध्ये लोकसेवक नवाज हे आले. पुन्हा तक्रारदार व पंच क्रे.1 यांना व्हाईस रेकॉर्डर चालु करून तहसील कार्यालयातील कॅन्टीनमध्ये लोकसेवक यांच्याकडे पाठविण्यात आले. त्यांनतर थोडया वेळात इशारा न करता बाहेर आले. तक्रारदार व पंच क्र. 1 यांना विचारले असता, त्यांनी सांगीतले की, लोकसेवक शेख नवाज हे कॅन्टीनमध्ये बसलेले होते. तेव्हा त्यांना मी सांगितले की, सर मी तुम्ही म्हणल्याप्रमाणे तीन हजार रूपये घेवून आलो आहे. काल उशीर झाला कुरळयाला गेलो होतो. त्यामुळे आज आलो आहे. तेव्हा लोकसेवक म्हणाले की राहुदया तुम्हच्या कडे मी तुम्हच्या घरी येवून घेवून जाते. कॉल करून येतो तेव्हा तक्रारदार म्हणाले की सर पैसे खर्च होवून जातात तेव्हा लोकसेवक म्हणाले की, काही हरकत नाही होवूदया खर्च नंतर घेतो असे बोलून पैसे घेण्यास टाळाटाळ केली.
दिनांक 12/11/2025 रोजी तक्रारदार यांचा कॉल आल्यानंतर सर्व सापळा पथक कंधार येथे गेलोत. त्यांनतर तक्रारदार यांच्या गळयामध्ये व्हॉईस रेकॉर्डर चालु करून व लाचेची रक्कम देवून पंच क्र 1 यांच्या सोबत तहसील कार्यालय कंधार येथे लोकसेवक याच्याकडे 13:58 वाजता पाठविण्यात आले. तक्रारदार व लोकसेवक नवाज हे कॅन्टीनमध्ये बसले होते. काही वेळाने तक्रारदार व पंच क्र. 1 हे काही एक ईशारा न देता तहसिल कार्यालय कंधार येथुन बाहेर आले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच क्र 02 व सापळा पथक असे तहसिल कार्यालयातुन बाहेर आलो. आम्ही पंच क्र. 1 यांना विचारले असता, त्यांनी सांगीतले की, लोकसेवक शेख नवाज हे तहसील कार्यालयातील कॅन्टीनमध्ये होते. तक्रारदार हे त्या कॅन्टीनमध्ये जावून लोकसेवक नवाज यांच्या जवळ जावून चहा घेतला. तेव्हा आम्ही त्यांच्या समोरील टेबल वर बसुन होतो. त्यांनतर तक्रारदार यांनी लोकसेवक यांना विचारणा केली की, सर आपण येतो म्हणला होतात घरी जेवन करायल पण आले नाही. तुम्ही म्हणल्या प्रमाणे पैसे घेवून आलो आहे. तेव्हा लोकसेवक म्हणाले की राहुदया हो नंतर देसाल की,, कुठ चालल्या घेतो की,, तेव्हा तक्रारदार म्हणाले मी नाही साहेब महिनाभर तुम्ही म्हणल्या होत्या त्या प्रमाणे पैसे घेवून आलो आहे... फोन पे करू का ,,, नाही तर माझो कडे खर्च होवून जाते त्यावर लोकसेवक म्हणाले की नाही नाही काही गडबड नाही मी घेतो ,,,,मी घेतो तुम्हाला बोलावून मग घेतो "तुमी जा निवात रहा माझ असच काम आहे. तुम्हच काम मी केले की नाही,,, आजुन काही असेल तर ते सागा ते पण करून देतो." तक्रारदार यांनी सांगीतल्या प्रमाणे संभाषण झाले असल्याचे आढळुन आले.
दिनांक 08/12/2025 रोजी तक्रारदार यांचा कॉल आल्यावर आम्ही सर्व सापळा पथक कंधार येथे रवाना झालो व तक्रारदार यांनी लोकसेवक नवाज यांना कॉल करून भेटीचे ठिकाण निश्चित करण्याकरीता कॉल केला असता, लोकसेवक मंडळ अधिकारी नवाज यांनी तक्रारदार यांचा कॉल उचलला नाही त्यामुळे लोकसेवक यांची भेट झाली नसल्यामुळे सर्व सापळा पथक परत आलोत. त्यानंतर दिनांक 17/12/2025 रोजी आम्ही सर्व सापळा पथक कंधार येथे सुरक्षीत ठिकाणी थांबुन तक्रारदार5 पंच व सर्व सापळा पथक यांना सापळा कार्यवाही बाबत पुर्वी दिलेल्या सुचनेची उजळणी करून दिली. 12:55 वाजता व्हाईस रेकॉर्डर चालु करून लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या कडे देवून लोकसेवक नवाज यांच्याकडे तहसील कार्यालय कंधार येथे तक्रारदार व पंच क्रं.1 यांना रवाना केले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं.1 हे तहसील कार्यालय येथे सर्व ठिकाणी लोकसेवक यांना शोधून ईशारा न करता तहसील कार्यालयाच्या बाहेर आले. पंच क्रं. 1 यांना विचारणा केली तेव्हा त्यांनी सांगितले की, लोकसेवक नवाज यांना तहसील कार्यालय कंधार येथील परिसरात शोधले असता लोकसेवक मिळुन आले नाही. त्यांनतर तक्रारदार यांनी लोकसेवक नवाज यांना फोन लावला व स्पिकर ऑन करून लोकसेवक यांना म्हणाले सर कुठे आहेत,,, लोकसेवक ,,,,, मी नांदेड ला आहे. तक्रारदार,,,,येतो म्हणलात की काय झाल,,,लोकसेवक,,,,, कधी तक्रारदार,,,,,,,आज आले नाही का,,, लोकसेवक,,,,,,नाहीना तक्रारदार ,,बदली झाली का तुम्हची लोकसेवक,,, करायची असेल तर करा मग बदली माझी ,,,,तक्रारदार ,,,आल्यावर या घराकड येतो म्हणल्या होत्या लोकसेवक,,, हो येतो येतो तक्रारदार,,,, तुमचे तीन हजार घेवून जा,,,देवून टाकतो लोकसेवक ,,,नाही काही विषय आपल्याला नाही पाहिजे,,,नाही काहीच नाही पाहिजे मी तुम्हाला नंतर फोन करतो,,, असे बोलून फोन ठेवले. असे हकीकत कथन केले. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर स्पिकर ऑन करून ऐकले असता त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाले लोकसेवक नवाज यांनी तक्रारदार यांच्या कडून लाचेची रक्कमे बाबत बोलले असता ,,पैसे नाही पाहिजे ,,,असे

बोलून पैसाचे बोलणे व स्विकारण्याचे टाळाटाळ करत असल्याचे दिसुन आले.

एकंदरीत सापळा कार्यवाही मध्ये लोकसेवक मंडळ अधिकारी शेख नवाज यांना तक्रारदार यांच्या वर सशंय आल्याने लाचेची रक्कम स्विकारणास टाळाटाळ करत असल्याचे दिसुन आले. तरी दिनांक 03/11/2025 रोजी लाचमागणी पडताळणी कार्यवाहीमध्ये लोकसेवक शेख नवाज शेख महबुब यांनी तक्रारदार यांच्या शेतीचे 7/12 व होल्डींग वर नाव विठोबा शंकर खाडे ऐवजी विठ्ठल शंकर खाडे असे दुरूस्त केलेल्या कामाचा मोबदला/बक्षिस म्हणुन 3000/- रू लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने लोकसेवक शेख नवाज शेख महबुब पद मंडळ अधिकारी (नागलगाव) नेमणुक तहसील कार्यालय कंधार ता.कंधार जि.नांदेड यांचे विरुध्द कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद** केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले)**:**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

APPA MURALIDHAR SANAP

**Rank (पद):** I (Inspector) **No.(क्र.):** ASI1111

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव)**:**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम** खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): chandrakant vinayal
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): 11201000359CVJM770: